सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २५० | मंगळवार, दि. २ जुन २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५१०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४००००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११६०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २५९०/-
भाव प्रती १० ग्राम

# श्री मंगळग्रह मंदिरात बुधवारपासून पंचदिन साध्य विष्णू पंचायन याग

## अधिकमास महात्म्य कथेचेही आयोजन; व्यास श्री. वे. मू. हरिषाचार्य गुरुजी करणार निरुपण



श्री. वे. मू. हरिषाचार्य गुरुजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात अधिकमासानिमित्ताने बुधवार, दि. ३ जून ते रविवार, दि. ७ जून २०२६ दरम्यान पंचदिन साध्य विष्णू पंचायन याग व अधिकमास महात्म्य कथेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. ३ जून २०२६ रोजी अधिकमासातील संकष्ट चतुर्थीच्या पवित्र पर्वात सकाळी ९ वाजता या यागाचा प्रारंभ होईल. आशियास्टार आयकॉन अवॉर्ड प्राप्त, अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे, जळगाव जिल्हाध्यक्ष तसेच समाजकार्य फाऊंडेशन, अमळनेरचे तालुकाध्यक्ष डॉ. सुप्रीम संजय पाटील हे प्रमुख यजमान असतील. तर नाशिक निवासी व्यास श्री. वे. मू. हरिषाचार्य गुरुजी यांच्या पवित्र वाणीतून अधिकमास महात्म्य कथेचे निरूपण केले जाईल. सदर याग दररोज दोन सत्रांत होईल.

दररोज सकाळी ९ ते ११ यावेळेत अभिषेक व अर्चन, तर दुपारी ३ ते ४ या वेळेत हवन पूजा होईल. तसेच दुपारी ४ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान व्यास श्री. वे. मू. हरिषाचार्य गुरुजी अधिकमास महात्म्य कथेचे निरूपण करतील. त्यानंतर सायंकाळी ६ ते ६.३० या वेळेत श्री मंगळग्रह देवतेची नियमित आरती होईल. या परम पवित्र यागाचे साक्षीदार होऊन अधिकमास महात्म्य कथेच्या श्रवणासाठी अमळनेर शहरासह तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळाने केले आहे.

आजचे
**अभीष्टचिंतन**





**डॉ. आनंद जोशी**
अमळनेर / धुळे



**श्री. सुरेश बाविस्कर**
सचिव, मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर



**श्री. युवराज चव्हाण**
सेवेकरी, श्री मंगळग्रह मंदिर, अमळनेर

# छोट्या 'संघातील' मोठे यश...!

## राष्ट्रवादी काँग्रेससाठी ठरेल बूस्टर डोस...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची झालेली पीछेहाट आणि पराभव खास करून आमदार अनिलदादा पाटील आणि पक्षकार्यकर्त्यांना निश्चितच जिव्हारी लागलेला आहे. राजकीयदृष्ट्या बसलेल्या 'सेटबॅक'मधून कमबॅक करून जोरदार उसळी मारण्याकरिता शेतकरी सहकारी संघाची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेसने खूपच प्रतिष्ठेची केली होती. यश शेवटी यश असते. त्यासाठी तुम्ही साम-दाम-दंड-भेद जे काही वापरले ते हल्लीच्या काळात गौण आणि क्षम्य ठरते.

पूर्वी जय-पराजयाचे निकष आणि आयाम खूप वेगळे अर्थात आदर्शवादी होते. मात्र हल्लीच्या काळात ऐनकेन प्रकारे मिळविलेल्या यशामुळे उधळलेल्या वारेमाप गुलालाच्या ढिगाऱ्याखाली आदर्शवाद आणि लोकशाहीला अभिप्रेत असलेली नीतिमूल्ये दबली जातात. यशाचा गुलाल सर्वांनाच माखून टाकतो.

कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसला राजकीयदृष्ट्या स्वतःचे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी हे यश हवेच होते आणि ते त्यांनी मिळविलेही...! परिणामी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते खास करून आमदार अनिलदादा पाटील यांचे मनोबल या यशाने निश्चितच उंचावल्याशिवाय राहणार नाही.

खरेतर विद्यमान आमदारांच्या पॅनलच्या विरोधात दोन पॅनलची निर्मिती होणे हे सुद्धा काहीसे धक्कादायकच होते. ही बाबही अनिलदादा व त्यांच्या निकटवर्तीयांच्या निश्चितच खटकली असेल. अर्थात शेतकरी संघाच्या निकालातून जो काही बोध घ्यायचा तो घेऊन आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये कदाचित भाजप जास्त त्रास आणि त्रागा न करता राष्ट्रवादी काँग्रेसकडून जितक्या जागा मिळतील तितक्या पदरात पाडून जुळून घेईल, असे वाटते. राष्ट्रवादी काँग्रेसलाही भाजपची साथ लाभल्यास त्यांच्या यशाचा आलेख निश्चितपणे अधिक उंचावेल. त्यामुळे शेतकरी संघाच्या निवडणुकीत जरी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे लढले ( सोजऱ्या -गोजऱ्या आणि मधाळ भाषेत सांगायचे झाल्यास मैत्रीपूर्ण लढले) तरी आगामी निवडणुकांमध्ये जे काही झाले-गेले ते विसरा आणि नव्या दमाने, नव्या निवडणुकांना सामोरे जाऊया, अशी मनोभूमिका खासदार स्मिताताई आणि आमदार अनिलदादा ठेवू शकतात. किंबहुना ती त्यांनी ठेवणे दोघांसाठी फायदेशीरच आहे. दोघांचेही कार्यकर्ते कदाचित त्यासाठी आग्रही राहतील. त्यासाठी मात्र काही महिन्यांची प्रतीक्षा सर्वांनाच राहील.




**शेतकरी संघ आणि तेथील निवडणुकीचे रंग-ढंग**

# स्वस्त झाले तरी कोण? मतदार की लोकशाही?

## अवघ्या पंचवीस रुपयांत झाली नीतिमत्तेची खुली विक्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

होणार...होणार म्हणून गाजत आणि वाजत असलेली अमळनेर शेतकरी सहकारी संघाची निवडणूक झाली. निकालही लागला. मात्र, अपप्रकारांची कीड किती दूरपर्यंत आणि खोलवर पोहोचली आहे, मतदारांची मानसिकता फक्त पंचवीस रुपयांपासून आत्मसन्मान आणि मतविक्री करण्याइतकी दयनीय झाली आहे, उमेदवारही विजयासाठी वाटेल ते करायला तयार होतात (काही सन्माननीय अपवाद वगळून) याचे विदारक चित्र या निवडणुकीच्या निमित्ताने पाहावयास मिळाले.

किमान एका छोट्याशा संस्थेची आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या असलेल्या या संस्थेची निवडणूक तरी विना पैशांची, स्वच्छ आणि खरेतर बिनविरोध व्हायला हवी होती, असेच आजही संस्थेच्या अनेक हितचिंतकांना वाटते. मात्र, कणभर हितचिंतकांवर मणभर नको त्या वृत्तीचे उमेदवार व मतदार भारी पडतात हेच यातून सिद्ध झाले आहे.

पूर्वी फक्त चांगले उमेदवारच विजयी होत होते. नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ, चारित्र्यवान, बुद्धिवान, सुशिक्षित, गोरगरिबांच्या व्यथा जाणणारे, विकासात्मक दूरदृष्टी असणारेच बहुतांश समर्पित उमेदवार विजय होत होते. त्याला पराभूत करण्यासाठी कोणीही कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले तरी ते यशस्वी होत नव्हते. मात्र, काळ बदलला 'जिसकी नोट उसको वोट', 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी', 'दो रोटी चार बोटी बाकी सब दुनिया झुटी' अशी मानसिकता वाढण्यास सर्वत्र सुरूवात झाली. 'निवडून आल्यावर सर्वच खातात. मग आम्ही उमेदवारांना खाल्ले तर काय बिघडले?' अशा स्वस्त मनोप्रवृत्तीची चलती वाढली आहे. तर विजयी उमेदवारही खुल्यापणाने हे विचारू लागले आहेत, की 'आम्ही निवडणुकीत जो पैसा खर्च केला तो कुठून काढणार?' अर्थातच या प्रश्नाचे उत्तर जनतेच्याच पैशातून शासनाने दिलेल्या निधीतून हे पैसे निघणार हे निश्चित...! आणि मग हे पैसे काढण्यासाठी फक्त कागदोपत्री विकासकामे

पान २ वर

# खादोड समर्थकांचा कारनामा; 'लक्ष्मी' कपाटातच!

## मतदार 'दर्शना'पासून वंचित राहिल्याने विरली मते हवेत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शेतकरी संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावात मोठमोठे दावे करत फिरणाऱ्या खादोड समर्थकांचा भलताच गाजलेला कारनामा आता समोर येऊ लागला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. 'आम्ही शेकडो मते मिळवून देऊ', 'पूर्ण गाव आमच्याच शब्दावर चालते', असे ठोकताळे मांडणाऱ्या या कट्टर समर्थकांनी उमेदवारांकडून घेतलेल्या 'लक्ष्मी'चे मतदारांना 'दर्शन' घडविण्याऐवजी ती थेट स्वतःच्या कपाटातच सुरक्षितपणे बंद केल्याची जोरदार चर्चा सध्या रंगली आहे. परिणामी मतदानाच्या दिवशी अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने उमेदवारांचे आकड्यांचे अंदाज साफ कोसळल्याचे वास्तव समोर आले.




**मते हिशेबापुरतीच; पेटी मात्र रिकामीच!**

दरम्यान, दोन-चार दिवस उमेदवारांसोबत गाडीतून फेऱ्या मारणे, गावात थोडीफार उपस्थिती दाखविणे, काही निवडक लोकांनाच फक्त खूश ठेवणे, रात्री ढाब्यांवर विविध मेजवानीवर ताव मारणे आणि उर्वरित रक्कम अलगद स्वतःच्या खिशात वळविणे अशीच 'सुपरहीट रणनीती' या समर्थकांनी राबविल्याचे दिसल्याची चर्चा आता रंगू

पान २ वर

# जून-जुलैमध्येही उष्णतेची लाट कायम

## मॉन्सून श्रीलंकेवरच रेंगाळला, आठवडाभरात केरळमध्ये पोहोचणे शक्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मॉन्सूनचे केरळमध्ये आगमन उशिरा होण्याची शक्यता असून जून-जुलैमध्ये उष्णतेची लाट कायम राहणार आहे. देशभरातील नागरिकांना दिलासा देणाऱ्या मॉन्सूनच्या आगमनाला यंदा विलंब होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) यांच्या माहितीनुसार श्रीलंकेजवळ निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मॉन्सूनची प्रगती मंदावली आहे. तो गेल्या पाच दिवसांपासून केरळ किनारपट्टीपासून अवघ्या ३० ते ३५ किलोमीटर अंतरावरच थांबून आहे. पुढील दोन ते तीन दिवसांतही त्याच्या पुढे सरकण्याची शक्यता कमी असल्याचे हवामान विभागाने सांगितले.

सामान्यतः मॉन्सून १ जून रोजी केरळमध्ये दाखल होतो. यंदा तो २६ मेपर्यंत केरळमध्ये पोहोचेल, असा अंदाज वर्तविण्यात आला होता. मात्र, बदललेल्या हवामान परिस्थितीमुळे आता मॉन्सूनला केरळ गाठण्यासाठी आणखी आठवडा तरी लागू शकतो. त्यामुळे सुरूवातीच्या अंदाजापेक्षा तो जवळपास दहा दिवस उशिरा देशात प्रवेश करेल.

**जून-जुलैमध्येहीउष्णतेचीलाटकायमराहण्याचाअंदाज**

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड, गुजरात आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये जून आणि जुलै महिन्यांतही उष्णतेची लाट कायम राहू शकते. या काळात साधारणपणे ३० ते ३५ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले जाते. मात्र, यंदा तापमान सरासरीपेक्षा सुमारे तीन अंशांनी अधिक राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

**यंदा सरासरीपेक्षा १० टक्के कमी पावसाचा अंदाज**

हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार यंदा देशात सरासरी ७८ सेंटिमीटर पर्जन्यमान होण्याची शक्यता आहे. हे प्रमाण दीर्घकालीन सरासरीपेक्षा सुमारे १० टक्के कमी आहे. यापूर्वी एप्रिलमध्ये ८० सेंटीमीटर पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. १९७१ ते २०२० या कालावधीतील आकडेवारीनुसार देशाचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ८७ सेंटिमीटर आहे.

**मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये कमी पावसाची शक्यता**

जून महिन्यात मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंडमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दुसरीकडे महाराष्ट्र, राजस्थान आणि गुजरातच्या काही भागांमध्ये सरासरीइतका पाऊस होण्याची शक्यता आहे.

पान २ वर




**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# दाऊदी बोहरा समाजातर्फे प्रवाशांसाठी शीतपेय वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रवास करणाऱ्या नागरिकांना उन्हाचा आणि प्रवासाचा त्रास कमी व्हावा या उद्देशाने अमळनेर येथील दाऊदी बोहरा समाजातील युवा बद्री ग्रुप आणि मयदी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने अमळनेर एसटी स्टँड परिसरात शीतपेय वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळी १ ते दुपारी २ या वेळेत पार पडलेल्या या उपक्रमाचा लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत असंख्य प्रवाशांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अमळनेर एसटी आगाराचे व्यवस्थापक श्री. प्रमोद बळीराम चौधरी यांचा दाऊदी बोहरा समाजाचे आमिल साहेब मुस्तफाभाई साहेब यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी १ जून रोजी असलेल्या एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त उपस्थितांना शुभेच्छाही देण्यात आल्या.

## संपादकीय



## एआयच्या फायदे-तोट्यांमध्ये अडकू नका.

'एआय फॉर गुड' या पुस्तकात, लेखक जोश टायरांगेल यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेला (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) तिच्या प्रत्यक्ष सामाजिक परिणामांच्या आधारावर समजून घेण्याची शिफारस केली आहे. डॉक्टर, शिक्षक, शेतकरी आणि सरकारी संस्था समस्या सोडवण्यासाठी एआयचा कसा वापर करत आहेत, हे हे पुस्तक दाखवते. टेस्लाचे संस्थापक, ओपन एआयचे सॅम ऑल्टमन आणि इलॉन मस्क यांच्यात कृत्रिम बुद्धिमत्तेवरून झालेल्या न्यायालयीन लढाईत हरले. अनेक वर्षांपासून एआयच्या धोक्यांविषयी आणि फायद्यांविषयी वादविवाद सुरू आहे. त्याच्या नियमनाचा मुद्दाही जोर धरत आहे. पण मते ऐकीव माहितीच्या आधारावर बनवावीत की हा वादविवाद अधिक चांगल्या प्रकारे कसा समजून घ्यावा? त्यांच्या 'एआय फॉर गुड' या पुस्तकात, लेखक जोश टायरांगेल यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. ते म्हणतात की एआय चांगले आहे की वाईट, या वादात कोणीही अडकू नये. त्यावर मत बनवण्यासाठी, ते वास्तविक जीवनात मानवांना कशी मदत करते हे पाहिले पाहिजे.एआयचा हा पैलू स्पष्ट करण्यासाठी, ते शाळा, रुग्णालये, सरकारी संस्था आणि संशोधन प्रयोगशाळांना भेट देतात. सामान्य लोक हे तंत्रज्ञान कसे वापरत आहेत आणि त्याद्वारे समस्या कशा सोडवत आहेत, हे ते दाखवतात.हे पुस्तक स्पष्ट करते की डॉक्टर निदान सुधारण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत, शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना शिकवत आहेत, शेतकरी पिकांचा नफा वाढवण्यासाठी एआयचा वापर करत आहेत आणि सरकारी संस्था मर्यादित संसाधनांसह काम जास्तीत जास्त करण्यासाठी एआयचा वापर करत आहेत. त्यामुळे, जोशचे पुस्तक तांत्रिक विषयासारखे वाटत नाही, उलट ते वाचकांना एक अर्थपूर्ण चर्चा उपलब्ध करून देते. एआय प्रभावी आहे की नाही या प्रश्नात अडकून न पडता, जोश ते फायदेशीर, निःपक्षपाती आणि उत्तरदायी आहे की नाही यावर लक्ष केंद्रित करतो.जोश एआयकडे संतुलित दृष्टिकोन ठेवतो. तो त्याला जादूची कांडी किंवा धोकादायक साधन मानत नाही. तो या पुस्तकात या तंत्रज्ञानाबद्दलच्या प्रश्नांची उत्तरे देतो. उदाहरणार्थ, तो त्याच्या पूर्वग्रहांवर चर्चा करतो. चुकीची माहिती, गोपनीयता, डीपफेक आणि रोजगारावरील त्याचा परिणाम यावर चर्चा केली आहे.

हे पुस्तक प्रवासवर्णन शैलीत लिहिलेले आहे, ज्यामुळे ते वाचनीय ठरते. विषयाचे सखोल स्पष्टीकरण देण्यासाठी यात विविध केस स्टडीजचा वापर केला आहे. जोश तांत्रिक विश्लेषणात अडकणे टाळतो आणि केस स्टडीज वाचकांना वेगवेगळ्या पैलूंवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करतात. तथापि, ज्यांना एआय धोरण, नियमन आणि त्याच्या अर्थशास्त्राबद्दल सखोल ज्ञान हवे आहे, त्यांना हे थोडे निराशाजनक वाटू शकते. जोश लिहितात की एआयवर सिलिकॉन व्हॅलीतील दिग्गज किंवा तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांचे नियंत्रण नसावे. त्याचा वापर सामान्य कामगार, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ आणि ना-नफा संस्थांनी मोठ्या प्रमाणावर केला पाहिजे. जर त्याचा वापर दैनंदिन जीवनात मानवी मूल्यांना लक्षात घेऊन केला गेला, तर त्याचा लोकांना फायदा होईल.

ज्यांना एआयचे सामाजिक उपयोग समजून घ्यायचे आहेत, त्यांना हे पुस्तक उपयुक्त वाटेल. हे पुस्तक यंत्रांबद्दल फारसे नाही, तर तंत्रज्ञान लोकांना त्यांची कामे अधिक चांगल्या प्रकारे करण्यास, समाजाची सेवा करण्यास आणि समस्या अधिक वेगाने सोडवण्यास कशी मदत करू शकते याबद्दल आहे. हे पुस्तक यावरही जोर देते की व्यवहारात, तंत्रज्ञान कधीही तटस्थ नसते. तुम्ही त्यातून काय साध्य करता, हे त्याचा वापर कोण करत आहे यावर अवलंबून असते.

# भारतीय चित्रपटसृष्टीचा 'शोमॅन' राज कपूर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा




स्मृती विशेष

भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात काही नावे अशी आहेत, जी केवळ कलाकार म्हणून नव्हे, तर एक संस्था म्हणून ओळखली जातात. यातील अग्रगण्य नाव म्हणजे 'राज कपूर'. त्यांना प्रेमाने 'शोमॅन' म्हटले जाते. पडद्यावरचा त्यांचा अभिनय असो किंवा पडद्यामागून त्यांनी केलेले दिग्दर्शन, राज कपूर यांनी भारतीय सिनेमाला जागतिक उंचीवर नेऊन ठेवले.

**सुरुवात आणि संघर्ष**

१४ डिसेंबर १९२४ रोजी पेशावरमध्ये जन्मलेल्या राज कपूर यांना अभिनयाचा वारसा त्यांचे वडील पृथ्वीराज कपूर यांच्याकडून मिळाला. अभिनयाची आवड लहानपणापासूनच असली, तरी स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी त्यांनी मोठी धडपड केली. १९४८ मध्ये वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी त्यांनी स्वतःची 'आर. के. फिल्म्स' ही संस्था सुरू केली. त्याकाळी एवढ्या तरुण वयात स्वतःचा स्टुडिओ उभारणे ही एक धाडसी घटना होती.

**'आवारा' आणि जागतिक ओळख**

राज कपूर यांनी साकारलेली 'आवारा' (१९५१) मधील व्यक्तिरेखा आजही अनेकांच्या लक्षात आहे. चार्ली चॅप्लिनच्या 'ट्रॅम्प' (Tramp) पात्रापासून प्रेरित झालेली ही भूमिका त्यांनी भारतीय मातीत इतकी रुजवली की, सामान्य माणूस स्वतःला त्यांच्या पात्रात शोधू लागला. त्यांचे चित्रपट केवळ भारतातच नाही, तर रशिया (तत्कालीन सोव्हिएत युनियन) आणि चीनमध्येही प्रचंड लोकप्रिय झाले. राज कपूर यांच्या चित्रपटांतील गाणी, विशेषतः मुकेश यांचा आवाज आणि शंकर-जयकिशन यांचे संगीत, ही त्यांच्या यशाची एक भक्कम बाजू होती.

**कलादृष्टी आणि सामाजिक बांधिलकी**

राज कपूर हे केवळ मनोरंजनासाठी चित्रपट बनवत नव्हते, तर त्यातून ते समाजातील गरिबी, विषमता आणि मानवी मूल्यांचे प्रश्न मांडत असत. 'श्री ४२०' असो किंवा 'मेरा नाम जोकर', त्यांच्या प्रत्येक कलाकृतीत मानवी भावनेचा एक वेगळा स्तर जाणवतो. 'मेरा नाम जोकर' हा चित्रपट त्यांच्या आयुष्यातील अत्यंत जवळचा आणि भावनिक प्रोजेक्ट मानला जातो, ज्यासाठी त्यांनी अनेक वर्षे मेहनत घेतली होती.

**वारसा :** त्यांनी केवळ भारतीय सिनेमाला समृद्ध केले नाही, तर कपूर घराण्याचा एक असा वारसा निर्माण केला, जो आजही भारतीय चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवत आहे. त्यांना मिळालेला 'पद्मभूषण' आणि 'दादासाहेब फाळके पुरस्कार' हे त्यांच्या अतुलनीय कार्याचे प्रतीक आहे. राज कपूर म्हणजे एक विचार, एक स्वप्न आणि भारतीय सिनेमाचे एक सोनेरी पर्व होते. आज चित्रपट निर्मितीची तंत्रे कितीही बदलली असली, तरी राज कपूर यांच्या चित्रपटांमधील साधेपणा आणि त्यातील भावना आजही प्रेक्षकांना भारावून टाकतात. एका सामान्य माणसाची स्वप्ने मोठ्या पडद्यावर मांडणारा हा 'शोमॅन' खऱ्या अर्थाने भारतीय चित्रपटसृष्टीचा आत्मा होता.






अमळनेर : पोलीस भरती व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांसोबत हैद्राबाद येथे कार्यरत पोलीस अधिक्षक वैभव गायकवाड, कपिल पवार, भूषण शिंदे आदी.

# पोलीस भरतीत यशस्वी झालेल्या यशवंतांचा सत्कार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पूज्य साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालय संचलित पूज्य साने गुरुजी मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र अमळनेर ,पातोंडा परिसर विकास मंच, राष्ट्रनिर्माण प्रबोधिनी पुणे व श्रमसाफल्य अभ्यासिका वेल्हाणे यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस भरतीत यशस्वी झालेल्या उमेदवारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रंथालयाचे माजी अध्यक्ष आत्माराम चौधरी उपस्थित होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून हैदराबादचे पोलीस अधीक्षक वैभव गायकवाड, नाशिक आदिवासी विकास विभागाचे सहआयुक्त कपिल पवार, अमरावती जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण शिंदे, अमळनेरचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, ग्रंथालयाचे सचिव प्रकाश वाघ ,प्रा. डॉ.अतुल सूर्यवंशी पाचोरा, श्रमसाफल्य अभ्यासिकेचे संचालक के. एल. पाटील, ग्रंथालयाचे संचालक ॲड.रामकृष्ण उपासनी,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक रवींद्र कुंभार ,राहुल पाटील व प्रा.अवीत पाटील मंचावर उपस्थित होते.

आपण जिद्द चिकाटी व संघर्षातून पोलीस भरतीत यशस्वी झालात आता पोलीस सेवेत रुजू झाल्यानंतर सर्वसामान्य जनतेची उत्तम सेवा करा असा सल्ला हैदराबादचे पोलीस अधीक्षक वैभव गायकवाड यांनी नुकत्याच पोलीस भरतीत यशस्वी झालेल्या तरुणांना दिला. आदिवासी विकास विभागाचे सहआयुक्त कपिल पवार, अमरावती जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण शिंदे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, प्रा. डॉ. अतुल सूर्यवंशी, के एल पाटील, सचिव प्रकाश वाघ, राहुल पाटील व कार्यक्रमाचे अध्यक्ष आत्माराम चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशस्वितांमधून शितल पाटील, हर्षल पाटील व रचना पाटील यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या स्पर्धा परीक्षा केंद्रातून मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले.

यावेळी पूज्य साने गुरुजी मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राला निशुल्क सेवा देणाऱ्या सर्व तज्ञ मार्गदर्शकांचा ग्रंथालयाच्या वतीने विशेष स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी कल्पेश संजय पाटील (ठाणे शहर पोलीस),गीतांजली नितीन पाटील (मीरा-भाईंदर पोलीस व मुंबई शहर कारागृह पोलीस),शितल युवराज पाटील (मुंबई शहर पोलीस),हेमंत रामकृष्ण काटे (धुळे एसआरपीएफ),हर्षल रवींद्र पाटील (मुंबई शहर पोलीस), अजय ईश्वर राजपूत (मुंबई शहर पोलीस),जगदीश राजाराम पाटील (एसआरपीएफ वरणगाव),अनिल जिजाबराव पाटील (मुंबई शहर पोलीस),योगेश प्रदीप पाटील (पालघर पोलीस),शशिकेश दीपक पाटील (सीआरपीएफ),गायत्री बारकू पाटील (ठाणे शहर पोलीस),रचना राजेंद्र पाटील (पालघर पोलीस), व श्याम शांताराम पाटील (एअर फोर्स)यांचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पियुषा इंजिनियर्स व कॉन्ट्रॅक्टर अमळनेरचे संचालक निलेश वाघ व हर्षदा वाघ यांच्या सौजन्याने स्मृतिचिन्ह तयार करून देण्यात आली. नगरसेवक राजूदादा फाफोरेकर, तलाठी एम.आर. पाटील, गोकुळ बोरसे,जयेश मालपुरे, दिनेश मनोरे, नरेंद्र पाटील यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचलन व आभार विजयसिंग पवार यांनी मानले.

## स्वस्त झाले तरी कोण? मतदार की लोकशाही?

**पान १ वरून :** करणे किंवा थातूरमातूर निकृष्ट दर्जाची विकासकामे करणे, सर्व प्रकारचे बेकायदेशीर व अवैध व्यवसायांना चालना देणे आदी सर्व प्रकार बहुतांश लोकप्रतिनिधी, राज्यकर्ते, राजकीय पदाधिकारी यांनी सुरू केले आहेत. आता तर मतांचा खुला बाजार आणि नीतिमत्तेचा कुटाणा इतका व्यापक व वेगवान झाला आहे, की त्याबद्दल आता कुणालाच काहीच सोयरसुतक वाटत नाही. उमेदवारी अर्ज भरणे, प्रचार करणे, मतदान करणे, मतमोजणी हे ज्याप्रमाणे निवडणूक प्रक्रियेचे अंग आहेत त्याचप्रमाणे प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांना मनसोक्त खाऊ-पिऊ घालण्यासाठी रग्गड पैसा खर्च करणे, मते विकत घेणे हे सुद्धा निवडणूक प्रक्रियेचेच अविभाज्य आणि अपरिहार्य भाग बनले आहेत. पैसे घेऊन मतदान करायचे आणि नंतर पाच वर्षे निकृष्ट कामे करणाऱ्या किंवा विकासकामे न करणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या नावाने बोटे मोडणे ही रोजचीच बाब होऊन बसली आहे. याला नवी राजकीय फॅशन म्हटले तरी चालेल. शेतकरी संघाच्या निवडणुकीत विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीप्रमाणे देखील मोठ्या प्रमाणावर मते विक्री झाली. चिंधी चोरी छाप पैसे घेणाऱ्या मतदारांनी असे करून स्वतःचा देखील पार कचरा करून घेतला आहे. लोकशाहीचे धिंडोळे काढले आहेत. अशा मनोप्रवृत्तीच्या मतदारांना सुधारण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे 'अंधोकी की गलियो मे आईने बेचना' असाच काहीसा प्रकार झाला आहे. शेतकरी संघासारख्या छोट्याशा संस्थेच्या निवडणुकीत लोकशाहीचा बाजार व खेळखंडोबा उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या काही नागरिकांनी दै. 'ग्लोबल महातेज'जवळ अत्यंत व्यथित मनाने, संतप्त होऊन प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. हे सारे काही लिखाण त्या प्रतिक्रियांचाच गोषवारा व इको इफेक्ट आहे.

## खादोड समर्थकांचा कारनामा; 'लक्ष्मी' कपाटातच!

**पान १ वरून :** लागली आहे. विशेष म्हणजे उमेदवारांना मात्र व्यवस्थितरित्या मतदारांना 'लक्ष्मी दर्शन' घडविले, काळजी करू नका, असा दिलासा देण्यात आला. यामुळे मते उमेदवारांसाठी केवळ हिशेबापुरतीच ठरली आणि पेटी मात्र रिकामीच राहिली, अशी स्थिती झाली. या प्रकारामुळे गावात चर्चेला उधाण आले असून, मते कुठे व कशी गायब झाली आणि 'लक्ष्मी' कुठे विरली? असा संतप्त प्रश्न सामान्य नागरिकांकडून उपस्थित केली जात आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांऐवजी अशा 'खादोड' प्रवृत्तीवर अवलंबून राहिल्यास पराभव कसा अटळ ठरतो, अशी प्रतिक्रिया जाणकार आणि ज्येष्ठ नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी अशा मध्यस्थ, स्वार्थाने बरबटलेल्या आणि विश्वासाला तडा देणाऱ्यांपासून सावध राहण्याची गरज व्यक्त होत आहे. थेट मतदारांशी संपर्क, पारदर्शक व्यवहार आणि विश्वासार्ह कार्यकर्त्यांवर भर देणे, यातच खरे यश सामावलेले असते, असेही मत अनेकांकडून व्यक्त होत आहे.

## जाहीर नोटीस

प्रति,

तमाम लोकांना विशेषतः विठोबा मका पाटील, व भिका मका पाटील व इतर यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अमळनेर ता. अमळनेर जि. जळगांव येथील गट नं. १५९३ क्षेत्र २ हे.२३ आर त्यासी आकार ०४ रु.८७ पैसे ही मिळकत कै. नामे. भिवसन तानकू पाटील यांचे वारस, भुकन भिवसन पाटील यांचे वारस, कमलबाई भिवसन पाटील, मका भिवसन पाटील, यांचे वारस व आम्ही तसेच इतर मयताचे वारस मिळकत पत्रीकेवर लावून आम्ही सर्व मालक कायदेशीर वारस आपणास मिळकत पत्रानुसार नाव लावून देवू विठोबा मका पाटील, भिका मका पाटील, यांची व सुमनबाई यादव यांचे वारस, बेबीबाई लोटन पाटील यांचे वारस, व इतर मयत वारसांच्या मालकीची आहे. सदर लोकांनी व मयत इतर वारसांनी आमच्या अशिलाच्या लाभात मौजे अमळनेर येथील गट नंबर १५९३ या शेतीची दिनांक २३/०७/२०२१ रोजी सौदापावती करून दिली आहे व त्याप्रमाणे वरील लोकांनी व त्यांच्या वारसांनी आमचे अशिलांकडून वेळोवेळी बयाणा पोटी रक्कमा साक्षीदारांसमक्ष स्विकारलेल्या आहेत. असे असतांना सदर मिळकतीवर मयताच्या वारसांची नावे लावण्यास अवधी लागला त्याच प्रमाणे सदरच्या मिळकतीवर काही वारसांची नावे अज्ञांन (अ.पा.क.) होती त्यामुळे कायदयाने अज्ञांनाची मिळकत विक्री करण्याची परवानगी घेणे मा. जिल्हा न्यायालयातून अनिवार्य होते. त्याच प्रमाणे अज्ञांनाच्या पालकांनी जिल्हा न्यायालय अमळनेर यांच्या कोर्टात परवानगीचे अर्ज दाखल केले होते परंतू सदरचे प्रकरण ज्या जिल्हा न्यायालयात दाखल होते ते मे. जिल्हा न्यायालय सुमारे १० ते १२ महीने व्हॅकंट असल्यामुळे सदरच्या प्रकरणास विलंब झाला त्यामुळे सदरच्या व्यवहारास झालेल्या विलंबास आमचे अशिलांनी चुक अथवा दिरंगाई केली नाही. आमचे अशिल हे वर नमूद मिळकतीचा करारनामा करण्यास पूर्वी ही तयार होते व आजही तयार आहेत. सदर मिळकती बाबत आमचे अशिल वरील लोकांकडून व मयताच्या वारसांकडून खरेदीखत करून घेणार आहेत. तसेच सदर मिळकती बाबत वर नमूद केलेल्या इसमांशी व मयताच्या वारसांशी सौदापावती, खरेदी-विक्री, गहाणगाठा व अन्य त-हेने तबदिल करण्याबाबत कोणताही व्यवहार करू नये तसे केल्यास तो रद्द व बेकायदेशीर समजण्यात येईल. व सदरचे मिळकतीबाबतचा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सदरचा व्यवहार पूर्ण करण्यास आमचे अशिल हे पुर्वीही तयार होते व आजही तयार आहेत.

तरी तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, मौजे अमळनेर येथील गट नंबर १५९३ या मिळकती बाबत कोणीही व्यवहार करू नये तो व्यवहार केल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून आमचे मार्फत दिली असे.

ता. १/०६/२०२६

शिक्का

**ॲड.आर.ए. निकुंभ**
बी.ए.एल.एल.बी. दिवाणी व
फौजदारी न्यायालय अमळनेर,
ता.अमळनेर मो.९२२६१६३३०२०

## जून-जुलैमध्येही उष्णतेची लाट कायम

पान १ वरून

**मॉन्सूनच्या 'कोअर झोन'वर परिणाम; शेतीसमोर आव्हान**

देशातील मॉन्सूनच्या 'कोअर झोन'मध्ये यंदा पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता आहे. या भागातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्याने त्याचा थेट परिणाम कृषी उत्पादनावर होऊ शकतो. या कोअर झोनमध्ये मध्य प्रदेश, छत्तीसगड, विदर्भ, झारखंड, ओडिशा, तेलंगणा तसेच उत्तर प्रदेश आणि बिहारमधील काही भागांचा समावेश होतो. या प्रदेशांमध्ये कमी पाऊस झाल्यास शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक फटक्याला सामोरे जावे लागू शकते.

**सामान्य नागरिकांवर काय परिणाम होणार?**

पावसातील कमतरतेचा फटका खरीप हंगामातील पेरण्या, उत्पादन आणि कृषी अर्थव्यवस्थेला बसू शकतो. कृषी उत्पादन घटल्यास भाजीपाला, कडधान्ये आणि इतर अन्नधान्यांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील उत्पन्न कमी झाल्यास ग्राहक खर्चावरही परिणाम होईल. याचा फटका ट्रॅक्टर, दुचाकी यांसारख्या वाहनांच्या विक्रीलाही बसू शकतो. पावसाअभावी धरणे आणि जलाशयांतील पाणीसाठा कमी राहू शकतो. तसेच उष्णतेची तीव्रता वाढल्याने वीजेची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी मॉन्सून आठ दिवस आधी दाखल झाला होता गेल्या वर्षी मान्सून २४ मे रोजी केरळमध्ये दाखल झाला होता, म्हणजे तो नियोजित वेळेपेक्षा आठ दिवस आधी पोहोचला होता. साधारणपणे मॉन्सून जूनच्या मध्यापर्यंत महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये पोहोचतो. मुंबईत तो ११ जूनच्या आसपास दाखल होतो, तर ८ जुलैपर्यंत संपूर्ण देश व्यापतो. मॉन्सूनची माघार साधारणपणे १७ सप्टेंबरपासून वायव्य भारतातून सुरू होते आणि १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होते. 'एल निनो'चा प्रभाव ठरणार निर्णायकहवामान विभागाच्या मते यंदा मॉन्सून कमकुवत राहण्यामागे 'एल निनो' हे प्रमुख कारण आहे. गेल्या १५० वर्षांच्या नोंदींनुसार, १९१८ मध्ये मॉन्सून सर्वांत लवकर म्हणजे ११ मे रोजी केरळमध्ये दाखल झाला होता, तर १९७२ मध्ये तो सर्वांत उशिरा १८ जून रोजी पोहोचला होता. यंदा जून महिन्यात एल निनोचा प्रभाव अधिक जाणवू शकतो. जुलै आणि ऑगस्टमध्येही त्याची तीव्रता कमकुवत ते मध्यम स्वरूपात कायम राहण्याचा अंदाज आहे. एल निनोमुळे समुद्राच्या पाण्याचे तापमान असामान्यरीत्या वाढते. त्यामुळे वाऱ्यांच्या प्रवाहात बदल होऊन जागतिक पर्जन्यमानाचे चक्र विस्कळीत होते. परिणामी काही भागांत दुष्काळ तर काही ठिकाणी अतिवृष्टी आणि पुराची परिस्थिती निर्माण होऊ शकते.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजसेवेचा वारसा जपत 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवत अनेक नागरिक, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली.

या रक्तदान शिबिराचे आयोजन आम आदमी पक्षाचे अध्यक्ष महेंद्र (नाना) साळुंखे, उपाध्यक्ष रामकृष्ण चिंतामण पाटील तसेच ललित सातपुते यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. शिबिरात एस.टी. महामंडळातील कर्मचाऱ्यांनीही उत्साहाने सहभाग नोंदवत रक्तदान केले. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांसाठी हा उपक्रम जीवनदायी ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.अहिल्याबाई होळकर यांच्या लोककल्याणकारी विचारांना अभिवादन करत समाजहितासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी नगरसेवक सुयोग धनगर, विलास कंखरे, मच्छिंद्र लांडगे, देवा लांडगे, नाना धनगर, जिभाऊ कंखरे, चेतन देवरे, धनराज धनगर, समाधान लांडगे, बापू धनगर, अनिल बागुल आदी उपस्थित होते.

**द्रौ. रा. कन्या शाळेत अभिवादन**

अमळनेर : खा.शि.मं. संचलित श्रीमती द्रौपदीबाई रामचंद्र शेठ कन्या शाळेत ३०१ वी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी करण्यात आली.पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारक व शाळेत राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.एस. एस. सुर्यवंशी, पर्यवेक्षक श्री एस. पी. वाघ, जेष्ठ लिपिक श्री. शामभाऊ पवार , प्रयोगशाळा सहाय्यक श्री.सतिश लाडगे,जेष्ठ शिक्षिका श्रीमती आर. एस. सोनवणे, जेष्ठ शिक्षक श्री. एस.एस. माळी यांनी पुजन केले. सौ. एस. एस. सुर्यवंशी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या राजकीय, सामाजिक व राष्ट्रीय कार्याची माहिती दिली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# रात्री झोपण्यापूर्वी अंघोळ करणे योग्य की अयोग्य? फायदे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवसभराच्या थकव्यानंतर रात्री झोपण्यापूर्वी अंघोळ करणे शरीरासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते.

**मानसिक ताण होतो कमी :** रात्री कोमट पाण्याने अंघोळ केल्यास दिवसभराचा थकवा आणि मानसिक ताण क्षणात दूर होतो.

**उत्तम आणि गाढ झोप येते :** अंघोळीमुळे शरीराचे तापमान संतुलित होते, ज्यामुळे रात्री नॅचरली खूप गाढ आणि शांत झोप लागते.

**त्वचेसाठी वरदान :** दिवसभर त्वचेवर जमा झालेली धूळ आणि घाम रात्री अंघोळ केल्याने निघून जातो, ज्यामुळे त्वचा निरोगी राहते.

**रक्तभिसरण सुधारते :** रात्रीच्या वेळी हलक्या गरम पाण्याने अंघोळ केल्याने शरीरातील रक्ताभिसरण वेगाने सुधारते.

**स्नायूंना मिळतो आराम :** जर तुमचे अंग दुखत असेल किंवा स्नायूंमध्ये कडकपणा असेल, तर रात्रीची अंघोळ स्नायूंना रिलॅक्स करते.

**कधी करावी अंघोळ? :** लक्षात ठेवा, झोपण्याच्या अगदी लगेच आधी नाही, तर साधारण १ ते २ तास आधी अंघोळ करणे सर्वात योग्य ठरते.

**आरोग्यासाठी फायदेशीर :** थोडक्यात सांगायचे तर रात्री अंघोळ करणे अयोग्य नसून आरोग्यासाठी आणि चांगल्या झोपेसाठी अत्यंत 'योग्य' आहे.

# बिना कोचिंग तीसरे प्रयास में यूपीएससी क्रैक कर बनीं आयपीएस



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

कहते है की मेहनत करने वालों की कभी भी हार नहीं होती है जो मेहनत करना जानते है वो एक न एक दिन सफल जरूर होते है। जो मेहनत करना जानते है उन्हे एक न एक दिन सफलता जरूर मिलती है। अगर इंसान को जिंदगी में सफल होना है तो उसे दी रात मेहनत करना उसके लिए बहुत जरूरी है आज हम उसी मेहनत का नतीजा आपके सामने लेकर आयें है, जिनका नाम है आयपीएस आशना चौधरी की है। आइए जानते है आयपीएस आशना चौधरी की सफलता की कहानी...

यूपीएससी की तैयारी के लिए कुछ छात्र ऐसे होते है जो बिना कोचिंग पेपर क्रैक कर लेते हैं और आयएएस-आयपीएस अधिकारी बन जाते हैं। आशना चौधरी भी उन्हीं में से एक हैं, जिन्होंने बिना कोचिंग अपने तीसरे प्रयास में यूपीएससी परीक्षा पास कर ली और आयपीएस अधिकारी बन गईं।

आयपीएस आशना चौधरी का जन्म २८ अगस्त १९९८ को यूपी के हापुड़ जिले के पिलखुवा में हुआ था। उन्होंने पिलखुवा के सेंट जेवियर स्कूल, उदयपुर के सेंट मैरी स्कूल और गाजियाबाद के दिल्ली पब्लिक स्कूल से अपनी स्कूली पढ़ाई पूरी की है। उन्हें १२ वीं बोर्ड परीक्षा में ९६.५ प्रतिशत मार्क्स मिले थे।

१२ वीं के बाद आशना ने डीयू के लेडी श्रीराम कॉलेज फॉर विमेन से अंग्रेजी साहित्य में ऑनर्स किया और बाद में दिल्ली के साउथ एशियन यूनिवर्सिटी से अंतर्राष्ट्रीय संबंधों में पोस्ट-ग्रेजुएशन की डिग्री हासिल की। उनके इसी एजुकेशनल बैकग्राउंड ने उनकी सफलता में महत्वपूर्ण भूमिका निभाई।

२.५ अंकों से चूकीं

आशना ने ग्रेजुएशन के तुरंत बाद यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू कर दी थी। पहली बार उन्होंने साल २०२० में परीक्षा दी थी, लेकिन वह फेल हो गईं थीं। इसके बाद दोबारा परीक्षा दी , लेकिन फिर भी वो महज २.५ अंकों से चूक गईं। अब दो बार की इस असफलता ने उन्हें थोड़ा निराश जरूर किया लेकिन तीसरे प्रयास में उन्होंने यूपीएससी क्रैक कर दिया।

**ऐसे बनीं आयपीएस**

साल २०२२ में अपने तीसरे प्रयास में आशना ने ऑल इंडिया ११६वीं हासिल की थी और वह आयपीएस के लिए चुनी गईं। यूपीएससी परीक्षा में उन्हें कुल ९९२ अंक मिले थे, जिसमें लिखित परीक्षा में ८२७ अंक और इंटरव्यू में १६५ अंक शामिल थे। आशना के उनका होम कैडर यानी यूपी कैडर मिला है। फिलहाल वह मथुरा में एएसपी के पद पर कार्यरत हैं।

**अधिकारी से की है शादी**

अगर आशना चौधरी के निजी जीवन की बात करें तो उन्होंने आयएएस अधिकारी अभिनव सिवाच से शादी की है। अभिनव ने यूपीएससी परीक्षा २०२२ में १२वीं रैंक हासिल की थी। वह हरियाणा कैडर के आयएएस अधिकारी हैं।

# भारतात उजवीकडे स्टेअरिंग आणि इतर देशांत डावीकडे असे का?

## कोणती पद्धत जास्त चांगली?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खरेतर याचे उत्तर फक्त ट्रॅफिक नियमांमध्ये नाही, तर इतिहास, युद्ध, साम्राज्य आणि संस्कृतीमध्ये दडले आहे. चला तर मग जाणून घेऊ लेफ्ट हॅन्ड ड्राईव्ह आणि राईट हॅन्ड ड्राईव्ह म्हणजे नेमके काय?

रस्त्यावर गाडी चालविताना आपण इतक्या सवयीने डाव्या बाजूने वाहन चालवतो, की त्यामागील कारण विचारातही येत नाही. पण परदेशात गेलेल्यावर किंवा तेथील व्हिडिओ पाहिल्यावर अनेक भारतीयांना पहिल्यांदा मोठा धक्का बसतो तो याच गोष्टीचा. अमेरिकेसारख्या देशांमध्ये गाड्या उजव्या बाजूने धावताना दिसतात, तर स्टेअरिंग डाव्या बाजूला असते. सुरूवातीला हे सगळे 'उलटे' वाटते. मग प्रश्न पडतो की काही देश डाव्या बाजूनेच गाडी का चालवतात आणि काही उजव्या बाजूने? यामागे नेमके कारण काय आहे?

सोप्या भाषेत सांगायचे झाले तर लेफ्ट हॅन्ड ड्राईव्ह स्टेअरिंग डाव्या बाजूला असते आणि गाड्या रस्त्याच्या उजव्या बाजूने चालतात. उदाहरण अमेरिका, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, चीन. आणि राईट हॅन्ड ड्राईव्ह स्टेअरिंग उजव्या बाजूला असते आणि वाहने डाव्या बाजूने चालतात. उदाहरण भारत, ब्रिटन, जपान, ऑस्ट्रेलिया. भारतामध्ये आपण जी पद्धत पाहतो, ती म्हणजे राईट हॅन्ड ड्राईव्ह सिस्टीम. अमेरिकेमुळे बदलली जगाची दिशा?

विसाव्या शतकात अमेरिकेत मोटार उद्योग झपाट्याने वाढला. विशेषतः फोर्ड मोटार कंपनीसारख्या कंपन्यांनी लेफ्ट हॅन्ड ड्राईव्ह गाड्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू केले. अमेरिकन गाड्यांची लोकप्रियता वाढल्यानंतर अनेक देशांनी उजव्या बाजूने वाहन चालविण्याची पद्धत स्वीकारली. यामुळे व्यापार, आयात आणि वाहतूक अधिक सोपी झाली.

### आज जगात कोणती पद्धत जास्त आहे?

आज जगातील बहुतांश देश उजव्या बाजूने वाहन चालवतात. मात्र भारतासह काही मोठे देश अजूनही डाव्या बाजूची पद्धत वापरतात. पुढच्या वेळी तुम्ही परदेशात जाऊन 'उलट्या बाजूने' धावणाऱ्या गाड्या पाहाल, तेव्हा लक्षात ठेवा, तो फक्त ट्रॅफिक नियम नाही, तर अनेक शतकांचा इतिहास अजूनही रस्त्यांवर धावत आहे.




### भारतात डाव्या बाजूनेच गाड्या का चालतात?

यामागे ब्रिटीश राजवटीचा मोठा प्रभाव आहे. भारतावर ब्रिटिशांचं राज्य असताना त्यांनी त्यांच्या ट्रॅफिक नियमांनुसार डाव्या बाजूने वाहन चालवण्याची पद्धत लागू केली. त्यामुळे भारतासह ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि इतर अनेक माजी ब्रिटिश वसाहतींमध्ये आजही हीच पद्धत कायम आहे.

### याची सुरूवात नेमकी कुठून झाली?

आजच्या आधुनिक ट्रॅफिक नियमांपूर्वीही लोक रस्त्याच्या एका विशिष्ट बाजूने प्रवास करत होते. मध्ययुगीन युरोपमध्ये बहुतेक लोक डाव्या बाजूने चालायचे. कारण त्या काळात बहुतेक लोक उजव्या हाताने तलवार वापरत असत. डाव्या बाजूने प्रवास केल्यास उजवा हात संरक्षणासाठी मोकळा राहत होता. मग उजव्या बाजूने वाहन चालवण्याची पद्धत कशी आली? इतिहासात नेपोलियन बोनापार्ट याचे नाव येथे महत्त्वाचे ठरते. नेपोलियनने युरोपातील अनेक भाग जिंकल्यानंतर उजव्या बाजूने प्रवास करण्याची पद्धत लागू केली. हळूहळू त्याचा प्रभाव अनेक देशांवर पडला आणि त्या देशांमध्ये राईट साईड ट्रॅफिक सुरू झाले.

### मग सर्व देश एकाच नियमावर का आले नाहीत?

कारण पूर्ण देशाची ड्रायव्हिंग साइड बदलणे खूप खर्चिक आणि कठीण काम असते. यासाठी रस्त्यांची रचना बदलावी लागते, ट्रॅफिक सिग्नल आणि नियम बदलावे लागतात, वाहने बदलावीत लागतात. नागरिकांना नव्याने ट्रेनिंग द्यावे लागते म्हणूनच बहुतेक देश जुन्या प्रणालीवरच कायम राहिले. जपानसारखे देश ब्रिटीश वसाहत नसतानाही डाव्या बाजूने का चालतात? हा प्रश्नही अनेकांना पडतो. जापानने रेल्वे आणि ट्रान्स्पोर्ट सिस्टीम विकसित करताना ब्रिटीश तंत्रज्ञानाचा प्रभाव स्वीकारला होता. त्यामुळे त्यांनीही डाव्या बाजूची प्रणाली स्वीकारली.




## महिनाभर 'लाल मिरची पावडर' खाल्ली नाही तर काय होते?

एक महिना लाल मिरची पावडर खाल्ली नाही तर आपल्या आरोग्यावर काय नेमका परिणाम होतो. हे जाणून घेऊ. **प्रतिकारशक्ती वाढते :** अवघ्या २१ दिवसांसाठी आहारातून लाल मिरची पूर्णपणे वगळल्यास शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वेगाने मजबूत होऊ लागते. **भेसळीपासून सुटका :** आजकाल बाजारात मिळणाऱ्या लाल मिरचीत कृत्रिम रंगांचा वापर केला जातो, जो रोजच्या खाण्यातून शरीराला हळूहळू कमकुवत बनवतो. **पोटाचे विकार थांबतात :** लाल मिरची सोडल्यास ॲसिडिटी, छातीतवपोटातहोणारीजळजळआणिअल्सरचात्रासकमीहोतो. **मुखाचे आरोग्य सुधारते :** तोंड येणे किंवा छाले पडण्याची समस्या थांबते. **हार्मोनल संतुलन :** अवघ्या तीन आठवड्यांच्या या बदलामुळे हार्मोन्सवर सकारात्मक परिणाम दिसून येतो.









# गणपती बाप्पांना अर्पण करा या ३ गोष्टी

## विघ्ने नक्कीच दूर होण्याबाबत आहे मान्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बुधवार, दि. ३ जून रोजी येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. या दिवशी भगवान श्री गणेशांची मनोभावे पूजा केल्याने जीवनातील सर्व संकटे आणि विघ्ने दूर होतात. गणपती बाप्पांना प्रसन्न करण्यासाठी आणि त्यांचा आशीर्वाद मिळविण्यासाठी पूजेदरम्यान या ३ खास गोष्टी नक्की अर्पण करा.

**१) दुर्वा (दूर्वांकुर) :** गणपती बाप्पांना दुर्वा अत्यंत प्रिय आहेत. संकष्टी चतुर्थीला गणेशाला २१ दुर्वांची जोडी अर्पण करावी.

**नियम :** दुर्वा अर्पण करताना 'ॐ गणाधिपाय नमः' किंवा 'ॐ गं गणपतये नमः' या मंत्राचा जप करावा. यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि सुख-समृद्धी नांदते.

**२) मोदक किंवा बुंदीचे लाडू :** गणपती बाप्पांना 'मोदकप्रिय' म्हटले जाते. मोदक हे आनंदाचे प्रतीक मानले जाते.

**नियम :** संकष्टीला गणपती बाप्पांना २१ मोदकांचा किंवा बुंदीच्या लाडूंचा नैवेद्य दाखवावा. जर घरी मोदक बनविणे शक्य नसेल, तर गूळ-खोबऱ्याचा नैवेद्य देखील चालतो. यामुळे बाप्पा लवकर प्रसन्न होऊन भक्तांची प्रत्येक इच्छा पूर्ण करतात.

**३) लाल रंगाची फुले (विशेषतः जास्वंद)**

गणपती बाप्पांना लाल रंग खूप प्रिय आहे. पूजेमध्ये त्यांना जास्वंदाचे फूल किंवा लाल रंगाचे गुलाब अर्पण करावेत.

**नियम :** फूल अर्पण करताना ते बाप्पांच्या चरणाशी किंवा डोक्यावर ठेवावे. लाल रंगाचे फूल अर्पण केल्याने कुंडलीतील मंगळ दोष शांत होतो आणि कामातील अडथळे दूर होतात.

संकष्टी चतुर्थीचे व्रत हे चंद्रदर्शनाशिवाय पूर्ण होत नाही. त्यामुळे रात्री चंद्राला अर्घ्य दिल्यानंतरच आपले व्रत सोडावे.



**३ जून रोजी संकष्टी चतुर्थी**

# श्री मंगळग्रह मंदिरात का मिळते गुळाची जिलेबी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात अमळनेर येथे श्री मंगळग्रह देवतेची स्वयंभू मूर्ती असलेले विश्वातील एकमेव प्राचीन मंदिर आहे. येथे महाप्रसादासोबत गुळाची जिलेबी मिळते. येथे दररोज श्री मंगळग्रह देवतेला प्रसन्न करण्यासाठी विविध प्रकारच्या पूजा,अभिषेक, महायाग व शांती होतात. त्यासाठी देशातून व विदेशातूनही खूप मोठ्या प्रमाणावर भाविक येतात. मंगळवारी भाविकांची संख्या खूप जास्त असते. या मंदिराचे मंगळग्रह सेवा संस्थेच्या माध्यमातून व्यवस्थापन होते. संस्था भाविकांना अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. जेथे दररोज कुंडलीतील मंगळ दोष शांत करण्यासाठी भाविकांची वर्दळ असते. मात्र, मंगळवारी ही संख्या लाखोच्या घरात असते. या ठिकाणी मंगळग्रह सेवा संस्थेच्या माध्यमातून भाविकांना अनेकविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्या सुविधांपैकी एक म्हणजे अतिशय माफक दरात उत्कृष्ट भोजन अर्थात महाप्रसाद पुरविणे होय.

या महाप्रसादातील गुळाच्या जिलेबीचे विशेष महत्त्व आहे. मंदिरात भाविकांना दिल्या जाणाऱ्या महाप्रसादात शुद्ध गावरान तुपातील वरण बट्टी (वरण पंचरत्न डाळींचे असते), बासमती तांदळाचा जिराभात, रश्श्याची मटकीची उसळ यांचा समावेश असतो. या महाप्रसादात देण्यात येणारी गुळाची जिलेबी शुद्ध गावरान तुपात बनविलेली असते. अशी मान्यता आहे, की श्री मंगळग्रह देवांना गूळ अतिशय प्रिय आहे. त्यामुळेच गुळाची जिलेबी प्रसाद स्वरूपात दिली जाते. तसेच देवाला अर्पण करण्यात येणाऱ्या दानातही गुळाचा समावेश अत्यावश्यक असतो. मंदिरात येणारे भाविक देवाच्या दर्शनाने किंवा विविध पूजा केल्याने आध्यत्मिक व भावनिक पातळीवर तृप्त होतात. तर येथील वैशिष्टपूर्ण प्रसाद ग्रहण केल्यानंतर आणि त्यातही गुळाच्या जिलेबीचे सेवन केल्यानंतर तिच्या चवीने पुरेपूर तृप्ती होते. प्रसादातील या अवीट चवीच्या गुळाच्या जिलेबीचीही सर्वत्र खूप चर्चा असते.



# तीन वर्षांतून एकदा येते 'ही' संकष्टी चतुर्थी

### अधिकमासामुळे ठरते खास; जाणून घ्या तारीख, चंद्रोदय आणि उपवासाची योग्य वेळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू पंचांगामध्ये संकष्टी चतुर्थीला विशेष महत्त्व आहे. जेव्हा ही संकष्टी चतुर्थी अधिकमासात (पुरुषोत्तम मास) येते तेव्हा तिला विभुवन संकष्टी चतुर्थी म्हटले जाते. भगवान श्रीगणेशांची पूजा, उपवास आणि चंद्रदर्शनासाठी हा दिवस अत्यंत शुभमानला जातो. असा विश्वास आहे, की या दिवशी योग्य विधींसह गणपती बाप्पांची पूजा आणि उपवास केल्याने जीवनातील सर्व संकटे दूर होतात आणि सुख, समृद्धी व सुदैव प्राप्त होते. अधिकमासात येत असल्यामुळे या संकष्टी चतुर्थीचे पुण्य अनेक पटींनी वाढते आणि भक्तांना विशेष आध्यात्मिक लाभ मिळतो. यावर्षी संकष्टी चतुर्थी दिवशी सर्वार्थ सिद्धी योग देखील तयार होत असल्याने या दिवसाचे महत्त्व आणखी वाढले आहे.

**तारीख :** पंचांगानुसार अधिकमासाच्या कृष्ण पक्षातील चतुर्थी तिथी ३ जून २०२६ रोजी रात्री ९ वाजून २२ मिनिटांनी सुरू होईल. ही चतुर्थी तिथी गुरुवार, दि. ४ जून २०२६ रोजी रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी संपणार आहे. उदय तिथी लक्षात घेता, विभुवन संकष्टी चतुर्थी ३ जून रोजी असणार आहे.

**शुभ वेळ :** यावर्षी विभुवन संकष्टी चतुर्थीला सकाळी ५ वाजून २८ मिनिटांपासून ते ११ वाजून ४६ मिनिटांपर्यंत सिद्धी योग जुळून येईल. जर तुम्ही उपवास करणार असाल तर सकाळी ५ वाजून २३ मिनिटे ते ८ वाजून ५१ मिनिटे या वेळेत बाप्पांची पूजा करू शकतात.

**चंद्रोदय वेळ :** पंचांगानुसार ३ जून रोजी चंद्र रात्री १० वाजून ४ मिनिटांनी दिसेल. त्यामुळे उपवास ठेवणारे रात्री १० वाजून ४ मिनिटे ते १० वाजून ४३ मिनिटे या वेळेत चंद्राला पाणी अर्पण करून पूजा करू शकतात.

### विभुवन संकष्टी चतुर्थीचे धार्मिक महत्त्व

धार्मिक श्रद्धेनुसार या दिवशी भक्तिभावाने उपवास करणे, गणेश मंत्रांचा जप करणे आणि रात्री चंद्राला पाणी अर्पण केल्याने सर्व प्रकारचे दुःख, अडथळे आणि नकारात्मक प्रभाव दूर होतात. अधिक मास हा स्वतः भगवान विष्णूला समर्पित मानला जातो, त्यामुळे या महिन्यात उपवास, दान आणि पूजेचे महत्त्व अधिकच वाढते. असे मानले जाते की, जे भक्त भक्तिभावाने आणि नियमितपणे हा उपवास करतात, त्यांच्या जीवनातील अडथळे दूर होतात आणि त्यांना सुख, शांती, कीर्ती आणि यश प्राप्त होते.

# अधिक मासातील ३३ अनारशांचे रहस्य

## जावयाला का दिले जाते जाळीदार वाण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अधिक मासाला धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे. हा महिना पूजा, जप, दानधर्म, व्रत आणि आत्मचिंतनासाठी शुभ मानला जातो. या काळात केलेले दान आणि सत्कर्म अधिक पुण्यदायी मानले जाते. त्यामुळे अनेक घरांमध्ये विविध धार्मिक परंपरा आणि कौटुंबिक रितीरिवाज पाळले जातात.

**लेक-जावयाला वाण**

याच अधिक मासात लेक-जावयाला वाण देण्याची खास परंपरा महाराष्ट्रात पाहायला मिळते. मुलगी आणि जावई यांना घरी बोलावून त्यांचा सन्मान केला जातो. त्यांना कपडे, मिठाई, फळे किंवा खास जाळीदार पदार्थ भेट म्हणून दिले जातात. या वाणामध्ये विशेषतः अनारसे, मैसूर पाक किंवा बत्तासे देण्याची पद्धत आहे. अनेक ठिकाणी चांदीच्या ताटात ३३ अनारसे देण्याची प्रथा देखील पाळली जाते.

**जाळीदार वाण का देतात?**

जाळीदार वाण देण्यामागे एक सुंदर प्रतीकात्मक अर्थ सांगितला जातो. जाळीतील अनेक छिद्रे ही माणसाच्या स्वभावातील दोष आणि नकारात्मक विचारांचे प्रतीक मानली जातात. असे वाण दान केल्याने नकारात्मकता दूर होते आणि जीवनात आनंद, समृद्धी आणि सकारात्मकता येते, अशी श्रद्धा आहे. तसेच जशी जाळीतून हवा सहजपणे आरपार जाते, तशीच नात्यांमध्ये मोकळेपणा आणि पारदर्शकता असावी, गैरसमज राहू नयेत, हा संदेशही या परंपरेतून दिला जातो. त्यामुळे अधिक मास हा केवळ धार्मिक महिना नसून नाती अधिक घट्ट करणारा आणि आपुलकी वाढवणारा काळ मानला जातो.



# जन्म ३, ६ किंवा ९ तारखेला झालाय?

## मग तुमच्यासाठी जून २०२६ कसा असेल? वाचा अंकशास्त्र


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अंकशास्त्रानुसार जून महिन्यात ३ विशिष्ट मूलांक असलेल्या लोकांचे नशीब सोन्यासारखे चमकणार आहे. या जातकांना करिअरमध्ये सुवर्णसंधी मिळतील. बऱ्याच काळापासून रखडलेली कामे आता वेगाने पूर्ण होऊ लागतील. उत्पन्नात चांगली वाढ होईल आणि व्यवसायातही मोठा नफा मिळण्याची शक्यता आहे. जे लोक बऱ्याच दिवसांपासून नोकरीच्या शोधात आहेत. त्यांना मनपसंत नोकरी मिळू शकते. चला तर मग जाणून घेऊया कोणते आहेत हे ३ नशीबवान मूलांक.

**मूलांक ३ :** जर तुमचा जन्म कोणत्याही महिन्याच्या ३, १२, २१ किंवा ३० तारखेला झाला असेल, तर तुमचा मूलांक ३ आहे. जून महिना या मूलांक असलेल्या लोकांसाठी अत्यंत शुभ ठरेल. या महिन्यात तुमची सर्व प्रलंबित कामे पूर्ण होतील. उत्पन्नात वाढ झाल्याने आर्थिक बाजू मजबूत होईल. एखाद्या महत्त्वाच्या किंवा प्रतिष्ठित व्यक्तीशी भेट होऊ शकते. व्यापाऱ्यांना व्यवसायात मोठा नफा मिळण्याची शक्यता आहे. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. परदेशी जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांची इच्छा या महिन्यात पूर्ण होऊ शकते, तसेच वडिलोपार्जित मालमत्तेतून चांगला लाभमिळण्याची शक्यता आहे.

**मूलांक ६ :** कोणत्याही महिन्याच्या ६, १५ किंवा २४ तारखेला जन्मलेल्या लोकांचा मूलांक ६ असतो. या मूलांकाच्या लोकांसाठी जून महिना अतिशय फलदायी राहील. तुमच्या सुख-सुविधा आणि ऐषोआरामात वाढ होईल. कार्यक्षेत्रात (ऑफिसमध्ये) तुमच्यावर एखादी मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी सोपवली जाऊ शकते. बिझनेसमध्ये बंपर नफा मिळण्याची शक्यता आहे. अचानक धनलाभाचे योग येत असून घरात किंवा कुटुंबात एखादे धार्मिक किंवा मांगलिक कार्य संपन्न होऊ शकते.

**मूलांक ९ :** कोणत्याही महिन्याच्या ९, १८ किंवा २७ तारखेला जन्मलेल्या लोकांचा मूलांक ९ असतो. जून महिना या लोकांसाठी खूपच लकी ठरणार आहे. तुमच्या आत्मविश्वासात आणि धैर्यात वाढ होईल. कोर्ट-कचेरीशी संबंधित जुने वाद किंवा प्रकरणांचा निकाल तुमच्या बाजूने लागून ते मिटतील. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामगिरीचे भरभरून कौतुक होईल. अचानक गुप्त धन किंवा अडकलेले पैसे मिळण्याची शक्यता आहे. तसेच बऱ्याच दिवसांपासून सतावत असलेल्या एखाद्या जुन्या आजारातून किंवा आरोग्याच्या समस्येतून तुमची सुटका होऊ शकते.




# हनुमानजींच्या जीवनातील ५ कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वाल्मिकी रामायणाशिवाय जगभरातील रामायणात हनुमानजीशी संबंधित शेकडो कथांचे वर्णन आढळते. त्यांच्या बालपणापासून ते कलियुगापर्यंतच्या हजारो कथा वाचायला मिळतात. हनुमानजींना कलियुगातील संकट निवारक देवता म्हटले आहे. केवळ त्याची भक्ती फलदायी असते. चला जाणून घेऊया असे कोणते ५ प्रसंग आहे जे आजही प्रचलित आहेत.

**१) चारों जुग परताप तुम्हारा :**

लंकावर विजय मिळवून अयोध्या परतल्यावर जेव्हा श्रीराम त्यांना युद्धात मदत करणारे विभीषण, सुग्रीव, अंगद इतरांना कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून भेटवस्तू देतात तेव्हा हनुमानजी प्रभू श्रीरामचंद्रांची प्रार्थना करतात.- 'यावद् रामकथा वीर चरिष्यति महीतले। तावच्छरीरे वत्स्युन्तु प्राणामम न संशयः।।'

**अर्थात :** 'हे वीर श्रीराम! जोपर्यंत या पृथ्वीतलावर रामाची कथा प्रचलित होत राहील, तोपर्यंत माझा प्राण या देहात वास करावा.' यावर श्रीराम त्यांना आशीर्वाद देतात- 'एवमेतत् कपिश्रेष्ठ भविता नात्र संशयः। चरिष्यति कथा यावदेषा लोके च मामिका तावत् ते भविता कीर्तिः शरीरे प्यवस्तथा। लोकाहि यावत्स्थास्यन्ति तावत् स्थास्यन्ति में कथा।'

**अर्थात् :** 'हे कपिश्रेष्ठ, असेच घडेल, यात शंका नसावी. जोपर्यंत माझी कथा जगात प्रचलित आहे, तोपर्यंत तुझी कीर्ती अमिट राहील आणि तुमच्या शरीरात प्राण राहतील जोपर्यंत हे लोक बनले राहतील, तोपर्यंत माझी कथा देखील स्थिर राहील.' चारों जुग परताप तुम्हारा, है परसिद्ध जगत उजियारा।।

**२) संजीवनी पर्वत दोनदा उचलले :**

बालपणी एकदा हनुमानजींनी देवगुरू बृहस्पतीच्या आज्ञेवरून वडिलांसाठी समुद्रातून संजीवनी पर्वत आणला. हे पाहून त्याची आई खूप भावूक होते. यानंतर श्रीराम-रावण युद्धात रावणाचा पुत्र मेघनाद याने शक्तीबाणाचा वापर केला तेव्हा लक्ष्मणासह अनेक वानर बेहोश झाले. जामवंताच्या सांगण्यावरून हनुमानजी संजीवनी वनौषधी घेण्यासाठी द्रोणाचल पर्वताकडे निघाले. वनौषधी ओळखू न आल्याने त्यांनी डोंगराचा एक भाग उचलला आणि परत जाऊ लागले. वाटेत त्याला कालनेमी राक्षसाने अडवले आणि युद्धासाठी आव्हान दिले. कालनेमी हा रावणाचा अनुयायी होता. कालनेमी रावणाच्या सांगण्यावरूनच हनुमानजींचा मार्ग अडवण्यासाठी गेला होता. पण श्रीरामभक्त हनुमानजींना त्याच्या कपटाची जाणीव झाली आणि त्याने लगेचच त्याचा वध केला.

**३) विभीषण आणि श्रीराम यांची भेट घडवून दिली :**

जेव्हा हनुमानजी सीतामातेच्या शोधात विभीषणाच्या महालात जातात. विभीषणाच्या महालावर कोरलेली श्रीरामांची खूण पाहून ते प्रसन्न होतात. तेथे विभीषण यांना भेटतात. विभीषणला परिचय विचारतात स्वतः रघुनाथांचा भक्त म्हणून ओळख करून देतो. हनुमानजी आणि विभीषण यांचे दीर्घ संभाषण झाल्यावर हनुमानजींना माहिती पडते की ही कामाची व्यक्ती आहे. यानंतर श्रीराम लंकेवर आक्रमण करण्याच्या तयारीत असताना विभीषणाचा रावणाशी वाद सुरू होता. शेवटी विभीषण राजवाडा सोडतात आणि प्रभू श्रीरामांना भेटण्यासाठी आतुरतेने समुद्राच्या या बाजूला येतात. विभीषण येताना पाहून वानरांनी शत्रूचा एक खास दूत असल्याचे जाणून त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवत नाही.

**सुग्रीव म्हणतात –** 'हे रघुनाथजी! ऐका, रावणाच भाऊ भेटायला आला आहे' प्रभू म्हणतात – 'हे मित्र! तुम्हाला काय वाटते ?' वानरराज सुग्रीव म्हणतात – 'हे नाथ! राक्षसांची माया कळून येत नाही. इच्छेने रूप बदलणारा हा कोणत्या कारणाने आला आहे हे माहीत नाही.' अशात हनुमानजी सर्वांचे सांत्वन करतात आणि प्रभू श्रीराम सुद्धा म्हणतात, की आश्रयाची भीती दूर केली पाहिजे हे माझे व्रत आहे. अशाप्रकारे श्रीराम-विभीषण यांची भेट हनुमानजींमुळेच निश्चित झाली.

**४) सर्वप्रथम रामायण लिहिले :**

धर्मग्रंथानुसार विद्वानांचे म्हणणे आहे, की हनुमानजींनी प्रथम रामकथा लिहिली आणि तीही आपल्या नखांनी खडकावर. ही श्रीरामकथ[...] वाल्मिकीजींच्या रामायणाच्[...] आधी लिहिली गेली होती[...] आणि ती 'हनुमद रामाय[...] म्हणून प्रसिद्ध आहे. ही[...] घटना घडली तेव्हा प्रभ[...] श्रीराम हे रावणावर विजय मिळविल्यानंतर अयोध्येत राज्य करू लागले होते आणि श्री हनुमानजी हिमालयात जातात. तेथे ते शिव तपश्चर्येदरम्यान रोज खडकावर नखांनी रामायणाची कथा लिहीत असत. अशा प्रकारे त्यांनी भगवान प्रभू श्रीरामांच्या महिमाचा उल्लेख करणारे 'हनुमद रामायण' रचले.

काही काळानंतर महर्षी वाल्मिकींनीही 'वाल्मिकी रामायण' लिहिले आणि ते लिहिल्यानंतर त्यांनी ते भगवान शंकरांना दाखवून त्यांना अर्पण करण्याची इच्छा झाली. ते रामायण घेऊन भगवान शिव यांचे निवासस्थान असलेल्या कैलास पर्वतावर पोहोचले. तेथे त्यांना हनुमानजी आणि त्यांनी लिहिलेले 'हनुमद रामायण' पाहिले. ते पाहून वाल्मिकी निराश झाले.

वाल्मिकींना निराश बघून हनुमानजींनी त्यांना निराश होण्याचे कारण विचारले तेव्हा महर्षी म्हणाले, [...]ी त्यांनी अथक [...]मानंतर रामायण [...]. पण तुमचे [...]ण पाहिल्यावर [...] माझ्या [...]मायणाकडे दुर्लक्ष होईल, असे वाटते. कारण तुम्ही जे लिहिले आहे त्या तुलनेत माझे रामायण काहीच नाही. त्यानंतर वाल्मिकींची चिंता दूर करण्यासाठी श्री हनुमानजींनी हनुमद रामायण पर्वत शिला एका खांद्यावर उचलून आणि महर्षी वाल्मिकींना दुसऱ्या खांद्यावर बसवून आपली रचना प्रभू श्रीराम यांना अर्पण करून समुद्रात विसर्जित केली. तेव्हापासून हनुमानजींनी रचलेले हनुमद रामायण उपलब्ध नाही. ती अजूनही समुद्रात पडून आहे.



**५) हनुमान आणि अर्जुन :**

आनंद रामायणात वर्णित आहे, की अर्जुनाच्या रथावर हनुमानजी विराजित होण्यामागील देखील कारण आहे. एकदा रामेश्वरम तीर्थमध्ये अर्जुनाचे हनुमानजींशी मीलन होते. या पहिल्या भेटीत अर्जुन हनुमानजींना म्हणाला- 'अरे, प्रभू श्रीराम आणि रावण यांच्यातील युद्धावेळी आपण तेथे होतात?'

**हनुमानजी –** 'होय', तेव्हा अर्जुन म्हणाला – 'आपले गुरू प्रभू श्रीराम हे धनुष्यधारी होते. मग त्यांना समुद्र पार करण्यासाठी दगडी पूल बांधण्याची काय गरज होती? जर मी तेथे हजर असतो तर मी समुद्रावर बाणांचा पूल बनविला असता. ज्यावर चढून तुमची संपूर्ण वानर सेनेने समुद्र पार केली असती.'

**यावर हनुमानजी म्हणतात –** 'अशक्य, बाणांचा पूल तेथे कोणतेही काम करू शकला नसता. आमचा एक ही वानर चढला असता तर तर बाणांचा पूल तुटला असता.'

**अर्जुन म्हणाला –** 'नाही, बघा हे समोर सरोवर आहे आणि आता मी त्यावर एक पूल निर्माण करतो. आपण या पुलावरून सहज सरोवर पार करू शकता.'

**हनुमानजी म्हणाले –** 'अशक्य'

तेव्हा अर्जुनने म्हटले – 'तुमच्या चालण्याने पूल तुटला तर मी आगीत प्रवेश करीन आणि तो तुटला नाही तर तुम्हाला आगीत जावे लागेल.'

हनुमानजींनी हे स्वीकार केले की जर माझी दोन पावले सहन केली तर मी पराभव स्वीकारेन.'

तेव्हा अर्जुनाने आपल्या प्रचंड बाणांनी सेतू तयार केला. सेतू निर्माण होयपर्यंत हनुमानजी लघुरूपात होते. परंतु सेतू तयार झाल्यावर त्यांनी विराट रूप धारण केले.

प्रभू श्रीरामांचे स्मरण करून हनुमानजी त्या बाणांच्या पुलावर चढले. पहिले पाऊल टाकताच संपूर्ण पूल डळमळू लागला, दुसरे पाऊल टाकताच तो कोसळू लागला आणि तिसरे पाऊल टाकताच तलावाचे पाणी रक्तमय झाले.तेव्हा श्री हनुमानजी सेतुहून खाली उतरले आणि अर्जुनाला अग्नी तयाराला सांगितले. अग्नी पेटल्यावर हनुमानजी आगीत उडी मारू लागले तेवढ्यात भगवान श्रीकृष्ण प्रकट झाले आणि म्हणाले 'थांबा!' अर्जुन आणि हनुमानजींनी त्यांना नमस्कार केला.

देवाने संपूर्ण प्रसंग जाणून घेतल्यावर म्हटले, की 'हे हनुमानजी, आपले तिसरे पाऊल सेतूवर पडले असताना मी कासव बनून सेतूखाली निजलेला होतो. आपल्या शक्तीमुळे पाय ठेवताच माझ्या कासव रूपातून रक्त निघू लागले. मी कासव रूपात नसतो तर हा सेतू तर आपल्या पहिल्या पावलातच तुटला असता' हे ऐकून हनुमानजींना कष्ट झाले आणि त्यांनी क्षमा मागितली. 'मी आपल्या पाठीवर पाऊल ठेवल्यामुळे मोठा गुन्हेगार ठरलो. माझा हा गुन्हा कसा दूर होईल देवा?'' तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, की हे सर्व माझ्या इच्छेने झाले आहे. काळजी करू नकोस आणि अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर तुला स्थान मिळावे, अशी माझी इच्छा आहे.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**